# प्रेस नोट

दिनांक - १६/१०/२०२६

## गुन्हे शाखेकडून ८० लाखांच्या खंडणीप्रकरणी दोन आरोपींना सापळा रचून अटक

मुंबई गुन्हे शाखेच्या कक्ष-९ पथकाने व्यावसायिकाकडून ८० लाख रुपयांची खंडणी मागणा-या दोन आरोपींना खंडणीची रक्कम स्वीकारताना सापळा रचून रंगेहाथ ताब्यात घेतले आहे. तक्रारदार व्यावसायिक यांच्या पालघर जिल्ह्यातील दगडखाण व्यावसायासाठी आवश्यक परवानग्यांच्या अनुषंगाने बनावट ग्रामसभा ठराव व ना-हरकत प्रमाणपत्र देऊन आरोपींकडून सुरुवातीला ४० लाख रुपये खंडणी यापूर्वी उकळण्यात आली होती. त्यानंतर व्यवसाय सुरू ठेवण्यासाठी आणखी ८० लाख रुपयांची मागणी करून पिस्तुलाचा धाक दाखवत जीवे मारण्याची धमकी दिल्याची तक्रार गुन्हे शाखेस प्राप्त झाली.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने गुन्हे शाखा कक्ष-९ च्या पथकाने दिनांक १५/१०/२०२६ रोजी अंधेरी (पश्चिम), मुंबई येथे सापळा रचून ३० लाख रुपयांची खंडणीची रक्कम स्वीकारताना दोन पुरुष आरोपीतांना ( वय अनुक्रमे ४२ वर्षे व ३७ वर्षे) ताब्यात घेतले. कारवाई दरम्यान आरोपींकडून चार मोबाईल फोन व खंडणीच्या व्यवहारातील रक्कम म्हणून स्वीकारलेली ३० लाख रुपये असलेली बॅग जप्त करण्यात आली आहे. सदर प्रकरणी अंबोली पोलीस ठाणेस कलम ३०८ (५), ३५१(३), ६१(२), ३(५) भा.न्या.सं. सह कलम ३, २५ शस्त्र अधिनियम अन्वये गुन्हा दाखल असून पुढील तपास गुन्हे शाखेच्या कक्ष ९ मार्फत करण्यात येत आहे.

सदरची उल्लेखनीय कामगिरी मा.पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई शहर, श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे), श्री.अनिल कुंभारे, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री.कृष्णकांत उपाध्याय, मा. पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण-१), श्री.नवनाथ ढवळे, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त (डि-पुर्व), श्री.धर्मपाल बनसोडे यांचे मार्गदर्शनाखाली प्रपोनि सचिन पुराणिक, सपोनि जयदीप जाधव, पोउनि कल्याण पाटील, सफौ सुनिल म्हाळसांक, पोह राहुल पवार, पोशि रविंद्र वाघमारे व मपोशि पूनम जगताप यांनी केली आहे.

-------------------